**प्रेसनोट** **दिनांक २३.०४.२०२५**

लोकसेवक शिवाजी गंगाधर उंबरजे वय ५७ वर्षे, पद- उप लेखापरिक्षक, नेम- सहकारी संस्था, सोलापूर वर्ग- ३, रा. २१ब, यशवंत हौसिंग सोसायटी, कुमठा नाका, सोलापूर यांनी तक्रारदार यांचेकडे २५०००/- रुपये लाचेची मागणी करुन पहिला हप्ता म्हणुन लाच रक्कम रु. १००००/- स्वतः स्विकारले वरुन जेलरोड पोलीस ठाणे, सोलापूर शहर येथे गुन्हा दाखल करणेची प्रक्रिया सुरु आहे.

| | |
|---|---|
| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग** | सोलापूर युनिट, पुणे परिक्षेत्र. |
| **गुन्हा नोंद क्रमांक** | जेलरोड पोलीस ठाणे, सोलापूर शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया चालु आहे. |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध कायदा कलम ७ प्रमाणे. |
| **आरोपीचे नांव व कार्यालय** | लोकसेवक शिवाजी गंगाधर उंबरजे वय ५७ वर्षे, पद- उप लेखापरिक्षक, नेम- सहकारी संस्था, सोलापूर वर्ग- ३, रा. २१ब, यशवंत हौसिंग सोसायटी, कुमठा नाका, सोलापूर |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | रु. २५०००/- |
| **स्विकारलेली लाचेची रक्कम** | पहिला हप्ता म्हणुन आज रोजी रु. १०,०००/- स्वतः स्विकारली आहे. |
| **थोडक्यात माहिती** | **पडताळणी दिनांक १५/०४/२०२५ रोजी व दि. १७/०४/२०२५ तसेच दिनांक २३/०४/२०२५ रोजी.** यातील तक्रारदार यांनी मौजे बोरामणी ता.दक्षिण सोलापूर जि.सोलापूर येथे विलासराव देशमुख मजुर सहकारी संस्था मर्या. स्थापन केली असुन त्या संस्थेचे ते माजी चेअरमन होते. सध्या सदर संस्थेचे चेअरमन हे तक्रारदार यांची पत्नी आहेत. सदर संस्थेच्या विरुध्द सहायक निबंधक सहकारी संस्था दक्षिण सोलापूर येथे तक्रारी अर्ज प्राप्त झाल्याने आलोसे यांना तक्रारदार यांच्या संस्थेची पाहणी करुन अहवाल सादर करणेबाबत आदेशीत केले होते. सदरचा अहवाल संस्थेच्या बाजुने सकारात्मक पाठविणेसाठी आलोसे यांनी रु. २५०००/- लाचेची मागणी करुन आज रोजी पहिला हप्ता म्हणुन रु. १०,०००/- लाच रक्कम स्वतः स्विकारली आहे. यावरुन वर नमुद लोकसेवक यांचे विरुध्द जेलरोड पोलीस ठाणे, सोलापूर शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे. |
| **मार्गदर्शन अधिकारी** | श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक लाप्रवि, पुणे.<br>डॉ. शीतल जानवे/खराडे, अपर पोलीस अधीक्षक,लाप्रवि, पुणे. |
| **पर्यवेक्षण अधिकारी** | श्री. गणेश कुंभार, पोलीस उप अधीक्षक,, ला.प्र.वि. सोलापूर |
| **सापळा पथक** | श्री. गणेश कुंभार, पोलीस उप अधीक्षक,, लाप्रवि, सोलापूर.<br>पोलीस अंमलदार- पोहकॉ/शिरीषकुमार सोनवणे, पोह/श्रीराम घुगे, पोकॉ/ राजु पवार, पोकॉ/ सचिन राठोड व चालक पोकॉ/शाम सुरवसे सर्व नेमणुक - लाचलुचपत प्रतिबंध विभाग सोलापूर यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे सोलापूर जिल्हयातील नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबद्दल अथवा त्याच्यावतीने लाच मागणा-या खाजगी व्यक्तींबद्दल तक्रार असल्यास त्वरीत लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे टोल फ्री क्रमांक १०६४ अगर दुरध्वनी क्रमांक ०२१७-२३१२६६८ वर संपर्क साधावा.

**संपर्क पत्ता**- पोलीस उपअधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, श्री छत्रपती शिवाजी रंगभवन चौक सोलापूर.

**संकेतस्थळ** - www.acbmaharashtra.gov.in

**ई मेल** - www.acbwebmail@mahapolice.gov.in, dyspacbsolapur@gmail.com

**ऑनलाईन तक्रार ॲप** – acbmaharashtra.net

संपर्क टोल फ्री क्रमांक – १०६४

दुरध्वनी क्रमांक – ०२१७-२३१२६६८.

२३/०४/२०२५

( गणेश कुंभार )
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबधं विभाग, सोलापूर.
मो.नं. ९७६४१५३९९९.

सह.पो.आयुक्त/पोलीस उप अधीक्षक
सत्यमेव जयते
ॲन्टी करप्शन ब्युरो, सोलापूर.

Scanned with CamS